GRAND ACADEMIC PORTAL
RESEARCH JOURNALS

GAP भाषा
A MULTILINGUAL JOURNAL OF RESEARCH
( ISSN – 2582-8770 )
Globally peer-reviewed and open access journal.

# स्त्री आत्मनिर्भरता: विदुषी गार्गीचे योगदान

## डॉ. अरुण पवार

सहाय्यक प्राध्यापक संस्कृत
वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर महाराष्ट्र - 440001

### *शोध सारांश*

*गार्गी ही प्राचीन काळातील प्रभावशाली विदुषी आणि धार्मिक विचारक होती. तिने स्त्रियांना कठोर परिश्रमाद्वारे सामाजिक, आर्थिक आणि आध्यात्मिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी प्रोत्साहित केले. स्त्री शक्तीकडे समाजाचे लक्ष वेधण्यात त्यांचे योगदान महत्त्वाचे आहे. स्त्री आत्मनिर्भरता विषयी गार्गीचे योगदान प्रेरणादायी आहे.*

*ऋग्वेद हा मुळात ऋचा-मंत्रांचा संग्रह आहे. या मंत्रांच्या सर्जनशीलतेचे श्रेय त्या काळातील ऋषी आणि ज्ञानी ऋषींना दिले जाते. वैदिक ऋचा या देवतांच्या स्तुतीबरोबरच त्या काळातील स्त्रियांच्या स्थिती विषयीचे ज्ञान प्राप्त करून देणाऱ्या आहेत. स्त्रियांच्या लेखणीतून साकार साहित्याच्या आधारे स्त्रीवादी दृष्टिकोन समजून घेऊन त्यांची सर्जनशील क्षमता उजेडात आणणे आवश्यक आहे.*

***संकेत शब्दः*** *स्त्री, योगदान, स्वावलंबन, आत्मनिर्भरता, वैदिक, वेदश्रोत्रिय, विद्या, मधुविद्या, विदुषी, ऋषिका, ऋषी, ज्ञान, आचार्य, शिक्षिका, ब्रह्मवादिनी, धनुर्वेद, गार्गी, मैत्रेयी, लोपामुद्रा, जनक, याज्ञवल्क्य, श्रुतवादिनी, विद्वान,ऋग्वेद, स्त्रीसंवेदना, आत्मसन्मान, कर्तृत्व, परिश्रम, प्रेरणा.*

## उद्देश्य

स्त्रियांना कठोर परिश्रमाद्वारे सामाजिक, आर्थिक आणि आध्यात्मिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी प्रोत्साहित करून स्त्री आत्मनिर्भर अर्थात महिला सक्षमीकरण आणि स्वावलंबनाला प्रोत्साहन देणे याविषयी विदुषी गार्गीचे योगदान सर्वमान्य आहे. महिला शक्तीकडे समाजाचे लक्ष वेधण्यात गार्गीचे योगदान महत्त्वाचे आहे. वैदिक काळातील स्त्रियांची स्थिती प्रकाशात आणणे, वैदिक आणि समकालीन समाजाच्या विवेचनातून व्यक्त झालेल्या स्त्रीसंवेदना लक्षात घेऊन विदुषी गार्गीच्या कार्यकर्तुत्वांवर प्रकाश टाकणे हा या संशोधनाचा उद्देश आहे.

## प्रस्तावना

भारतासारख्या संपन्न संस्कृती लाभलेल्या देशात प्राचीन काळापासून स्त्रीला अनन्यसाधारण महत्त्व असल्याचे आढळून येते.[1] नंतरच्या काळात यात प्रचंड बदल झाल्याचं चित्र पहावयास मिळते.अशाही परिस्थितीत स्त्री आज दृढ आत्मविश्वासाने कर्तृत्व सिद्ध करण्यासाठी सिद्ध झाली आहे. हा प्रवास अर्थातचं अडचणींचा प्रचंड आव्हानात्मक होता आणि आहे. आपल्याकडे अगदी प्राचीन काळापासून महिलांच्या स्वावलंबनासाठी प्रयत्न झालेला दिसून येते. स्त्री आत्मनिर्भरता विषयी गार्गीचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आणि प्रेरणादायक आहे. गार्गी ही प्राचीन काळातील एक अत्यंत प्रभावशाली विदुषी आणि धार्मिक विचारक होती. गार्गीने वेदश्रोत्रिय आणि विद्वान्मणी असलेल्या परंपरेतील त्यांच्या कौटुंबिक संपत्तीचा विवेचन केला आहे. स्त्रियांना ज्ञान प्राप्ती, तिचे आत्मनिर्भरता आणि समाजातील सहभाग या विषयीचे योगदान मोलाचे आहे. गार्गीच्या धार्मिक विचारांमुळे स्त्री स्वतंत्रता, स्वाधीनता आणि सामाजिक

[1]. ऋग्वेद - ३.५३.४.

https://www.gapbhasha.org/

समानतेचा मार्ग प्रेरक आहे.[2]

प्राचीन भारत जेव्हा तात्विक विषय, अभ्यास आणि चिंतन प्रमुख बनले, तेव्हा अनेक स्त्रियांनी त्यांचे जीवन अभ्यास आणि ज्ञान संपादन करण्यासाठी समर्पित केल्याचे वर्णन आहे. त्या काळात वैदिक आणि तत्वज्ञान इत्यादींच्या शिक्षणाव्यतिरिक्त स्त्रिया गणित, वैद्यक, संगीत, नृत्य आणि हस्तकला इत्यादींचाही अभ्यास करीत असत. तसेच क्षत्रिय स्त्रिया धनुर्वेद म्हणजे युद्धशास्त्र[3] शिकून युद्धातही सहभागी झाल्याचे वर्णन आढळते.[4]

भारतीय संस्कृतीत वैदिक काळापासूनचं स्त्रियांकरिता विशेष आदर, मान-संमान असल्याचं वर्णन मनुस्मृतीत केले आहे.[5] संहिता काळात स्त्रियांना शिक्षण दिले जात असल्याचे वर्णन आहे.[6] काही जणी ब्रह्मवादिनी होत्या ब्रह्मवादिनी म्हणजे ब्रम्हन् आत्मन् अशा आध्यात्मिक संकल्पनांचं सखोल ज्ञान असल्याने त्याविषयी बोलू शकणाऱ्या स्त्रिया असा अर्थ केलेला दिसून येते. पुरुषांच्या बरोबरीने ब्रह्मवृंदात बसून त्या वादविवादात सहभागी होत असत. ब्रह्मविद्येचा सखोल अभ्यास करून विद्वत सभेत निर्भीडपणे आत्म्यतत्त्वांविषयीचे प्रश्न त्या विचारीत असत.[7] प्रसंगी वाद-विवादात पुरुषांनाही जिंकण्याचं सामर्थ्य त्यांच्या ठायी असल्याचे वर्णन आढळते. अशा विदुषी स्त्रिया आचार्या असल्याचे उल्लेखही आढळतात. आत्मतत्त्वाचं ज्ञान प्राप्त करून तेजःपुंज झालेल्या वैदिक स्त्रिया विविध विषयांचं अध्ययन-अध्यापनही करीत असल्याचे वर्णन ऋग्वेदात आहेत.[8]

ऋग्वेदातील अश्विनीकुमारांना उद्देशून सूक्तरचना करणारी विदुषी घोषा ही स्त्री अशीच ब्रह्मवादिनी होती. स्वतःचा दुर्धर रोग तिने तिच्या आत्मिक बळाने दूर केला असल्याचे वर्णन आहे. अश्विनीकुमारांनी संतुष्ट होऊन तिला 'मधुविद्या' शिकवली असा तिच्याबद्दल उल्लेख ऋग्वेदात आढळतो.[9] मधुविद्या म्हणजे चिरतरुण राहण्यासाठी आवश्यक असलेलं ज्ञान, मैत्रेयी ही याज्ञवल्क्य ऋषींची पत्नी होती, तीही ब्रह्मविद्येत निपुण असल्याचे वर्णन आहे. तिनेही भौतिक संपत्तीला असार मानून आत्मविद्या संपादन केल्याचे वर्णन आहे.[10] गार्गी वाचक्नवी ही मैत्रेयीच्याच काळातील विदुषी, मिथिलेचा राजा जनक याच्या विद्वतसभेत अनेक विद्वानांना तिने वादात जिंकले असल्याचे वर्णन सर्व विदित आहे.[11] लोपामुद्रा ही अगस्त्य ऋषींची पत्नी, तीही ब्रह्वादिनी होती.[12] पाणिनी या व्याकरणशास्त्रकाराने आणि कौटिल्यानेही गुरूकुल चालविणाऱ्या गुरुतुल्य आचार्य स्त्रियांचा स्पष्ट उल्लेख केलेला दिसून येते. प्राचीन काळी अनेक स्त्रिया या शस्त्रास्त्रविद्येत आणि युध्दकलेतही निपुण होत्या. अनेकविध शास्त्रात निपुण असणाऱ्या स्त्रियांचेही उल्लेख आहेत.[13] भास्कराचार्यांनी कन्या लीलावतीला गणितविद्येत पारंगत केल्याचे वर्णन आहे.[14] शारदाम्बा नावाच्या स्त्रीने शंकराचार्यांना वादात जिंकलले असल्याचे वर्णनही आढळतात.[15] आजही गार्गी आणि मैत्रेयीची परंपरा आपल्या देशात कायम असल्याचे चित्र आपण पाहतो आहे.

ऋग्वेदात ज्या स्त्रियांचा उल्लेख विदुषी, ज्ञानी आणि तज्ज्ञ असे केलेला आहे. त्यां 'ऋषिका' होत्या. "ऋषिका शब्दाचा प्रयोग नंतरचा असावा. ऋग्वेदात ऋषी हा शब्द स्त्री आणि पुरुष दोघांसाठी वापरला गेला आहे. त्यांच्या कार्याच्या

---

2. नारी विमर्श भारतीय परंपरा -सं.कृष्णादत्त पालीवाल, सस्ता साहित्य प्रकाशन मंडल -२०१७ पृ. १२५.
3 यजुर्वेद - १६.४४.
4. नारी विमर्श भारतीय परंपरा -सं.कृष्णादत्त पालीवाल, सस्ता साहित्य प्रकाशन मंडल -२०१७ पृ. १२५.
5. मनुस्मृती- ३.३५.
6.तैत्तरीय संहिता -६.२.११.
7. ऋग्वेद- १०.१०९.४१.
8. ऋग्वेद -१०.८५.७.
9. वैदिक साहित्य का इतिहास - जयदेव वेदालंकार , न्यू भारतीय बुक कॉरपोरेशन दिल्ली- २०१८- भूमिका - पृ.क्र. १२
10. बृहदाराण्यकोपानिषद -४.५.१.
11. बृहदाराण्यकोपानिषद - २.१.१.
12. वैदिक साहित्य में नारी, डॉ. मालती शर्मा,संपूर्णानंद संस्कृत विश्वविद्यालय वाराणसी, १९९०,-पृ. १३३.
13.कौटिलीय अर्थशास्त्र, र. पं. कंगले, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ – १९९५- उपोद्घात- पृ.२१.
14. लीलावती, संपा. बच्चू शर्मा.खेमराज श्रीकृष्णदास मुंबया, १९६४- भूमिका-पृ.३.
15. नारी विमर्श भारतीय परंपरा -सं.कृष्णादत्त पालीवाल, सस्ता साहित्य प्रकाशन मंडल -२०१७ -पृ. २१३.

https://www.gapbhasha.org/

आधारावर ऋषींचे दोन वर्ग आहेत, एक एकांती आणि दुसरा कुटुंबावर आधारित असे. एकाकी ऋषीनी स्वतः मंत्र रचले आणि कुटुंब ऋषी असे आहेत ज्यांच्या कुटुंबात इतर मंत्र द्रष्टा असावेत. अदिती, अदिती दाक्षयणी, उर्वशी, गोधा, जुहूब्रह्मजया, रोमशा, वागम्भ्रिणी, श्रद्धा कामायनी, सरमा देवशुनी आणि सूर्यसावित्री या एकाकी ऋषी आहेत. घराण्यातील ऋषींमध्ये अत्रेय कुळातील आपला, विश्ववरा, इंद्र कुळातील इंद्राणी, इंद्रस्य स्नुषा, इंद्रमातरो आणि शची पौलोमी, अगस्त्यांची शिष्या, अगस्त्याची पत्नी लोपामुद्रा, अगस्त्य स्वसा लोपायन माता, वैवस्वत कुळातील यमी आणि शिखानपिनी वंशाची नावे आढळतात.[16]

वैदिक स्तोत्रांत देवांची स्तुती, धार्मिक आणि आध्यात्मिक स्वरूपाचे वर्णन आहेत. मंत्राद्वेष्टा स्त्री असण्याचीही ओळख वैदिक ऋषींच्या मंत्रात दिसल्याशिवाय राहत नाही. स्त्री ऋषींनी त्यांचे कुटुंब आणि त्यांच्याशी संबंधित सर्व सामाजिक चालीरीती विषयीचे चिंतन केल्याचे वर्णन आढळतात. मंत्रांत ती तिच्या घरासाठी, कुटुंबासाठी, पतीसाठी, मुलांसाठी सुख आणि शांतीची कामना केल्याचे वर्णन आहे. पतीपासून संरक्षण, कुटुंबावर विजय आणि अधिकारासाठी प्रार्थना करीत असत. इंद्रसनुषासारखी ऋषी आपल्या सासरच्या यज्ञातील अनुपस्थिती आणि सेवा न करू शकण्याबद्दल ती चिंता व्यक्त केल्याचे वर्णन आहे.[17]

गार्गीबद्दल असे मानले जाते की ती गर्गा कुळातील होती म्हणून तिला गार्गी म्हटले गेले. उपनिषद काळातील या विद्वान स्त्रीबद्दल असा उल्लेख आहे की एकदा राजा जनकाने एका यज्ञाच्या वेळी घोषणा केली की जो कोणी या सभेत स्वत:ला सर्वात मोठा विद्वान सिद्ध करेल त्याला सोन्याच्या पानांनी जडवलेल्या शिंगे असलेल्या हजार गायी भेट दिल्या जातील. ही घोषणा ऐकून एकही विद्वान पुढे आला नाही. यावर याज्ञवल्क्य ऋषींनी आपल्या शिष्यांना त्या गायींना आश्रमाकडे नेण्यास सांगितले. तेव्हा त्या सभेत उपस्थित विद्वानांचा याज्ञवल्क्यांशी वाद झाला. त्याला प्रश्न विचारणाऱ्यांमध्ये गार्गीही होती. गार्गीने विचारलेले प्रश्न अगदी साधे पण तात्विक, गंभीर आणि त्यात अनेक प्रश्न दडलेले होते.

जर याज्ञवल्क्यांनी त्या गायींना पळवून लावले असते आणि त्याच्या ज्ञानाबद्दल कोणी प्रश्न विचारला नसता, तर त्याला ज्ञानाचा क्षय आणि विनाश म्हटले गेले असते. गार्गीने विचारलेले प्रश्न आणि त्यांना मिळालेली उत्तरे ज्ञानात वाढ आणि आनंदाचे कारण ठरली. ती इतकी मंत्रमुग्ध झाली की तिने याज्ञवल्क्यला परम ब्राह्मण म्हणून स्वीकारले आणि तिथे उपस्थित असलेल्या इतर प्रतिस्पर्धी ब्राह्मणांना म्हणाली तुम्हाला तुमचे कल्याण हवे असेल तर याज्ञवल्क्याला नमस्कार करून तुमच्या मोक्षाचा मार्ग शोधा. त्या सभेत गार्गीने सिद्ध केले. एक अतुलनीय वादविवाद करणारे. याचे श्रेय मिळाले आणि त्यामुळेच त्यांना वाचकनवी म्हटले गेले असावे. गार्गी वाचनवी.[18]

## निष्कर्ष

वैदिक काळापासून भारतीय संस्कृतीत महिलांना अत्यंत आदर दिले. महिला स्वतः शिक्षिका, ब्रह्मवादी तसेच ब्रह्मवृंदा होत्या, त्या विविध शास्त्रार्थात सहभागी होत असत. धर्मशास्त्राचा सखोल अभ्यास करून आत्म्याविषयी असंख्य प्रश्न उपस्थित करून चर्चा करीत असत. ज्ञानप्राप्तीनंतर दीपस्तंभ झालेल्या विविध विषयांचे अध्यापनही केल्याचा उल्लेख आहे.

समानतेकडे वाटचाल करण्याकरिता आत्मनिर्भर होण्यासाठी समाजाने सर्व स्थरातून स्त्रीयांना मदत केली पाहिजे. विदुषी गार्गीच्या उदाहरणावरून आपल्या लक्षात येते की, स्त्रिया स्वत: वाटचाल करण्यास सक्षम आहेत, मग ते कोणतेही क्षेत्र असो. स्त्री शक्तीला प्रेरणा देऊन तिला आत्मनिर्भर केले पाहिजे. स्त्रियांची सामाजिक, आर्थिक आणि आध्यात्मिक स्थिती सुधारण्यास तिला शिक्षणासोबत योग्य संसाधने प्रदान केली पाहिजे, ज्ञान आणि परिश्रमातून महिलांना सक्षम करण्यास गार्गी प्रेरणादायी आहे. आपल्या क्षमतेने आत्मनिर्भर होऊन, स्त्री समाजात सकारात्मक

16. हिंदी साहित्य का आधा इतिहास, सुमन राजे, भारतीय ज्ञानपीठ, दिल्ली, २०१७ - पृ.८४.
17. तत्रैव- पृ.८५.
18. बृहदाराण्यकोपानिषद -३.६.८.

https://www.gapbhasha.org/

बदल कसा घडवून आणू शकते. याविषयी विदुषी गार्गीची कथा विशेष योगदान देणारी आहे. तिच्या कार्याने समाजातील प्रत्येक स्थराला स्त्रीशक्तीची जाणीव करून दिली आहे. तसेच महिलांना स्वातंत्र्याकडे वळविण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. या प्रेरणादायी व्यक्तिमत्वाच्या माध्यमातून आपण महिला स्वावलंबनाचे महत्त्व समजून घेऊ शकतो आणि त्यातून समृद्ध आणि सक्षम समाज निर्माण करू शकतो.

https://www.gapbhasha.org/